# १९. अंधश्रद्धा/लपंडाव

विषय थोडा विचित्र वाटतो ना ? पण दोन्ही शब्दांचे खूप जवळचे नाते आहे.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा ह्या एकाच नाण्याच्या २ बाजू आहेत. आधी श्रद्धा जन्मते का अंधश्रद्धा ? हा एक संशोधनाचाच विषय आहे.

माझ्या मते अंधश्रद्धा आधी जन्म घेते. त्याचा संबंध प्रत्येकाशी फार पूर्वीपासून म्हणजेच लहानपणापासून येतो.

शेवटी श्रद्धा म्हणजे काय तर विश्वास. प्रत्येकाच्या मनाचा एक कोपरा दुबळा असतो. त्यामुळे वेळोवेळी प्रत्येकाला कशावर तरी श्रद्धा ठेवावी लागते. माणसागणिक परिस्थिती नुसार श्रद्धास्थाने बदलत असतात. असे असले तरी प्रत्येकाची देवावर किंवा अज्ञात शक्ती वर श्रद्धा असते.

आपण देवळात जातो तेव्हा आपण पहातो कि तरूण जोडपे आपल्या नवजात बालकाला घेऊन देवदर्शनाला आलेले असतात. हाच तो अंधश्रद्धा डोक्यात जाणाचा पहिला प्रसंग. श्रद्धा ही डोळस पणे ठेवली जाते.

ज्याच्यावर श्रद्धा असते त्याच्या शक्तीची आपल्याला जाणीव असते. परंतु अंधश्रद्धेचे तसे नसते. आपण आपली वैचारीक बैठक बाजूला ठेवून भावनेच्या आहारी जाऊन कोणावर तरी श्रद्धा/विश्वास ठेवतो.

अंधश्रद्धेचे बरेच प्रकार आपण पहातो/पेपरात वाचतो. प्रत्येकाची वेगळी त-हा. कोणी उपास करतो, देवाला १११ फे-या मारतो, अनवाणी पायाने दर्शनाला जातो, कडक उपास करतो, नवस फेडतो, बळी देतो.

आज मी अशाच अंधश्रद्धेच्या प्रकाराबद्यल सांगणार आहे. कदाचित तुम्ही ते बघितले असेल परंतु फार विचार केला नसेल आणि म्हणूनच हा प्रकार बघितल्यानंतर मला लपंडावाच्या खेळाची आठवण झाली. आपण सर्वजण लहानपणी लपंडाव खेळतो. तोच लपंडाव मोठेपणापर्यंत चालूच असतो. वेगवेगळया स्वरूपात. आपण आपल्याशी सुद्धा लपंडाव खेळत असतो. जेव्हा एखादी गोष्ट आपण स्वीकारायची नाकारतो तेव्हा तो लपंडावाचा एक भाग बनतो. असो.

पूर्वीच्या काळी माणसाला सूप्तशक्ती प्राप्त झाली होती. त्या शक्तीच्या बळावर माणूस देवाला जिंकायला निघाला व पळापळीचा खेळ सुरू झाला. सर्व देवांची सभा झाली व कोठे लपावे याचा विचार विनिमय झाला. वेगवेगळया देवांनी वेगवेगळया सुचना केल्या. शेवटी एक देवाने असे सुचविले कि आपण माणसाच्या अंतरंगातच लपून बसूया. तेव्हापासून माणसाचा लपंडाव सुरू आहे. माणूस देवळात देवाला शोधायला जातो पण माणसाच्या देवाला मात्र बघू/शोधू शकत नाही.

रोज सकाळी फिरायला जातो तेव्हा एक अंधश्रद्धेचा प्रकार बघायला मिळतो. तो असा.
चहाच्या टपरीचा मालक सकाळी एक ग्लास चहा करतो, रस्त्याच्या मध्य भागी येऊन रस्त्यावर पाणी ओततो व गरम चहा रस्त्यावर टाकतो. फिरून येईपर्यंत चहा वाळलेला असतो व मुंग्या जमायला सुरवात झालेली असते.
माझ्यामनात विचार आला की हाच चहा दिवसातल्या पहिल्या ग्राहकाला फुकट दिला तर तो देवाला दिल्यासारखाच आहे. चहा तर फुकटच जातो. रस्ता खराब होतो. त्यापेक्षा पहिला ग्राहक त्याला दुवा देईल.

मित्रांनो काय वाटते तुम्हाला ?

आपण सर्वांनीच जर अंधश्रद्धेवर विचार केला व त्यातील फोलपणा व्यावहारीक दृष्टीतून जोखला तर जग किती सुंदर होईल. मला त्या दिवसाची ओढ आहे पण तो दिवस उजाडेपर्यंत मी मात्र बहुदा ह्या जगात नसेन.